तरुण भारत संवाद ■ रविवार, ५ फेब्रुवारी २०२३

# अंतर्मुख होऊन स्वत:सह समाजहित जोपासा

## प्रा.प्रवीण बांदेकर यांचे प्रतिपादन : दोडामार्ग हळबे महाविद्यालयात प्रा.बांदेकर यांचा सत्कार

वार्ताहर
दोडामार्ग

बॅ. नाथ पै, मधु दंडवते यासारखी महनीय व्यक्ती आपल्या कोकणला लाभल्या. या व्यक्तींनी संसद गाजवली होती. मात्र, आता त्यांच्यासारखा कोणीही नाही. दोडामार्गातूनही अनेक ऊर्जादायी व्यक्तिमत्वे होऊन गेली आहेत. तुमच्यातीलच कोणीतरी आता पुढे येणे गरजेचे आहे. अंतर्मुख होऊन स्वत:चा व समाजाचा विकास करावा, असे आवाहन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक प्रा. प्रवीण बांदेकर यांनी केले आहे.



दोडामार्ग : हळबे महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण बांदेकर यांचा सत्कार करताना अभिजीत हेगशेटये. सोबत विवेकानंद नाईक, भाई परमेकर, राजेंद्र केरकर, सुभाष सावंत, सुहास देसाई व अन्य. समीर ठाकुर

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित सांस्कृतिक महोत्सव २०२३ या कार्यक्रमात ते बोलत होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अभिजित हेगशेटये यांच्या हस्ते साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त प्रवीण बांदेकर यांना शाल, श्रीफळ देऊन नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर पानवळ–बांदा गोगटे–वाळके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोविंद काजरेकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, स्वातंत्र्यसैनिक भाई परमेकर, उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विवेकानंद नाईक, पर्यावरण तज्ञ राजेंद्र केरकर, डॉ. हेमंत पेडणेकर, दोडामार्ग व्यापारी संघटनेचे अध्यक्ष लवू मिरकर, तालुका पत्रकार समिती अध्यक्ष सुहास देसाई, भूषण सावंत उपस्थित होते.

बांदेकर म्हणाले, विद्यार्थी वयातच आपल्यातील कलागुणांना वाव दिला पाहिजे. याचा भविष्यात नक्की फायदा होतो. लहान वयात मला माझ्या शिक्षकांचे असे मार्गदर्शन लाभले. त्यांनी माझ्यातील सुप्त गुण ओळखून त्याची मला जाणीव करून दिली. माझ्यावर प्रेम करणारी आणि माझ्या साहित्याविषयी आस्था दाखवणाऱ्यांबद्दल मला खूप मोठा आदर आहे. आजचा हा सत्कार माझ्या मातीतला आहे. हा क्षण आयुष्यभर जपून ठेवण्यासारखा असतो.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय खडपकर यांनी केले. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.